# <u>नमुना 'अ'</u>

## (नियम 3 पहा)

महाराष्ट्र जमिन महसुल (जनजातीच्या व्यक्तिंनी जनजातीयेतर व्यक्तिंकडे भोगाधिकार हस्तांतर करणे) नियम 1975 याच्या नियम 3 अन्वये द्यावयाची जाहीर नोटीस.

ज्याअर्थी, जिल्हाधिकारी अहमदनगर यांच्याकडे, सोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या व श्री सुरेश दौलत माळी रा. सोनई ता. नेवासा यांच्या मालकीच्या मौजे सोनई (नवीन) गट नं. 743/2 मधील 0 हे. 80 आर पैकी क्षेत्र 0 हे. 40 आर आकार रु. 0.95 पैकी या नवीन शर्तीच्या जमिनीचा भोगाधिकार विक्रीद्वारे अकृषिक प्रयोजनासाठी घेण्यासाठी अर्ज आलेला आहे.

श्री. सुरेश दौलत माळी रा. सोनई ता. नेवासा जि. अहमदनगर हे उक्त जमिनीच्या बाबतीत मोबदल्याच्या रुपाने रु. 2,66,592/- (अक्षरी रु. दोन लाख सहासष्ट हजार पाचशे ब्याण्णव मात्र) एवढया रक्कमेपोटी श्री पिराजी राजाराम शिंदे रा. सोनई ता. नेवासा जि. अहमदनगर यांना विक्री देणार आहेत. आणि ज्या अर्थी मौजे सोनई (नवीन) या गावामध्ये अथवा त्यापासून पाच किलोमिटरच्या परिसरात राहाणारी जर एखादी जनजातीय व्यक्ती मालकाकडून भोगाधिकार स्विकारण्यास तयार असेल तर कलम 36 अ पोटकलम (1) च्या परंतुकाच्या उपबंधान्वये तिला अग्रक्रम दयावयाचा आहे.

त्याअर्थी आता ज्या जनजातीय व्यक्ति सोनई या गावाच्या रहिवासी आहेत अथवा त्याच्यापासून पाच किलोमीटरच्या परिसरात रहात आहेत आणि ज्यांची श्री. सुरेश दौलत माळी रा. सोनई ता. नेवासा जि. अहमदनगर यांच्याकडून विक्रीद्वारे भोगाधिकार स्विकारण्याची आणि त्यासाठी मोबदल्याच्या रुपाने रक्कम रु. 2,66,592/- (अक्षरी रु. दोन लाख सहासष्ट हजार पाचशे ब्याण्णव मात्र) एवढी श्री. सुरेश दौलत माळी रा. सोनई ता. नेवासा जि. अहमदनगर यांना देण्याची तयारी आहे. अशा व्यक्तिंचे अर्ज या नोटीशीच्या प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत खाली सही करणार यांचेकडेस सादर करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

### अनुसूची

### भोगाधिकाराचे वर्णन

| जिल्हा | तालुका | गाव | स.नं./ ग.नं. | क्षेत्र हे आर | आकारणी रु. पैसे | जनजातीय हस्तांतर कर्त्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| अहमदनगर | नेवासा | सोनई (नवीन) | 743/ 2 | 0 हे. 80 आर पै. क्षेत्र 0 हे. 40 आर | 0.95 पै. | श्री. सुरेश दौलत माळी रा. सोनई ता. नेवासा जि. अहमदनगर |

अपर जिल्हाधिकारी अहमदनगर

क्र.कावि/कुका/कक्ष 10-अ/आदि.एस.आर./1249/2018

ठिकाणः अहमदनगर, दि. 01/08/2018